| | |
|---|---|
| **CNR NO.MHSN170044992020** | दाखल दिनांक – २९.०४.२०२२<br>नोंदणी दिनांक – ०९.०५.२०२२<br>निकाल दिनांक – २३.०४.२०२६<br>कालावधी – वर्ष ०३ महिने ११ दिवस २६ |

**विटा येथील अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – उषा वि. इंदापुरे)**

**विशेष खटला क्र. २१४/२०२४**
**(जुना विशेष खटला क्रं.८१/२०२२)**

**निशाणी – ४९**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासनतर्फे पी. आय. पोलीस स्टेशन, आटपाडी.<br>जि. सांगली. |
| **उपस्थिती** | सरकारतर्फे अति. सरकारी अभियोक्ता,<br>श्रीमती व्ही. के. मुरचिटे. |
| **आरोपी** | **१. सचिन मधुकर मोरे,**<br>वय– सज्ञान, व्यवसाय – शेती,<br>रा. मोरे मळा, दिघंची, ता. आटपाडी, जिल्हा–सांगली.<br><br>**२. दादासो मधुकर मोरे,**<br>वय– ३८ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. मोरे मळा, दिघंची, ता. आटपाडी, जिल्हा–सांगली. |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. जी. लाड. |

## नमुना–ब

| | |
|---|---|
| घटना दिनांक | १३.१२.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १४.१२.२०२१ |
| दोषारोप दिनांक | १८.०६.२०२४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २३.०६.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | २३.०४.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | लागू नाही. |

## नमुना–क

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये आरोपी किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन मधुकर मोरे | ०४/०७/२०२३ | १३/०७/२०२३ | भा. द. वि. कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक सुधारीत) कायदा कलम ३ (१)(आर)(एस)व ३(२)(व्हीए) अन्वये. | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |
| २. | दादासो मधुकर मोरे | १५/०१/२०२२ | ११/०१/२०२२ रोजी अटकपूर्व जामीनवर सोडले. | भा. द. वि. कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक सुधारीत) कायदा कलम ३(१)(आर)(एस) व ३(२)(व्हीए) अन्वये. | निर्दोष मुक्त | नाही | लागू नाही. |

## नमुना–ड

### अ– सरकारपक्षातर्फे साक्षीदार

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | निशाणी | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | सुरज ज्ञानेश्वर वाघमारे | १३ | फिर्यादी |
| २. | प्रशांत उर्फ पप्पू सिध्देश्वर सातपूते | १८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ३. | भारत पांडूरंग खांडेकर | १९ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ४. | नंदकुमार रतनराव देशमुख | २५ | पंच साक्षीदार |
| ५. | आबासो सर्जेराव पदमाळकर | ३० | साक्षीदार |
| ६. | डॉ. अतुल बाबूराव कवडे | ३२ | वैद्यकीय अधिकारी |
| ७. | श्रीमती पद्मावती शिवाजीराव कदम | ३९ | तपास अधिकारी |

### ब– बचावपक्षातर्फे साक्षीदार

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| ––– | ––––– | ––––– |

### क– न्यायालयातर्फे साक्षीदार

| अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| ––– | ––––– | ––––– |

### सरकारपक्ष / बचावपक्ष / कोर्ट तर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी– अ– सरकारपक्षातर्फे

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १४ (स.सा.क्र.१) | फिर्याद. |

| | | |
|---|---|---|
| २. | २४<br>( बचावपक्षाने मान्य केला) | फिर्यादीच्या जातीचा दाखला |
| ३. | २७<br>(स.सा.क्र.४) | पोलिस उप निरिक्षक, पो.स्टे. आटपाडी यांचे तालुका कृषी अधिकारी यांना दिलेले दिनांक १५/१२/२०२१ चे पत्र. |
| ४. | २८<br>(स.सा.क्र.४) | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | ३३<br>(स.सा.क्र.६) | एम.एल.सी. सर्टीफिकेट |
| ६. | ३४<br>(बचाव पक्षाने मान्य केले) | आरोपी सचिन याचे बोनाफाईड सर्टीफिकेट |
| ७. | ३५<br>(बचाव पक्षाने मान्य केले) | आरोपी दादासाहेब याचा शाळा सोडल्याचा दाखला. |
| ८. | ४०<br>(स.सा.क्र.७) | पोलिस अधिक्षक, सांगली यांचे दिनांक १४/१२/२०२१ चे उपविभागीय पोलिस अधिकारी, विटा यांना दिलेले पत्र. |

**ब–बचावपक्षातर्फे**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | ----- | ----- |

**क– न्यायालयातर्फे**

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड– मुद्देमालाचे वर्णन**

| अ.क्रं. | मुद्देमालाचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टीकल 'ए' | एक तीन पेऱ्याची ३ फूट ७.५ इंच लांबीची कळकाची भरीव काठी. |

## – न्या य नि र्ण य –
## (पारीत केला दिनांक २३ एप्रिल २०२६)

आरोपी क्र. १ व २ यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक सुधारीत) कायदा २०१५ चे कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) अन्वये सदरचा खटला दाखल केला आहे.

२. सरकारपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

गौरीशंकर मारुती शिरकांडे रा. राजेवाडी याच्या ट्रॅक्टरवर वर्दीजबाब देणारा चालक म्हणून काम करतो. सिध्देश्वर सातपुते यांच्या शेतातील ऊस तोडणीचे काम चालू असल्यामुळे वर्दीजबाब देणारा ट्रॅक्टरने ऊसाची वाहतुक करीत होता. घटनेच्या एक वर्षापूर्वी वर्दीजबाब देणारा हा सचिन मधुकर मोरे रा. मोरे मळा, दिघंची याच्याकडे ट्रॅक्टरवर चालक म्हणून काम करीत होता. त्यावेळी त्याला व त्याच्या भावाला दरमहा रुपये १४,०००/– पगार ठरला होता. सचिन मोरे याच्या ट्रॅक्टरवर वर्दीजबाब देणाऱ्याने तीन महिने व त्याचा भाऊ रणजित याने तीन महिने वाहन चालक म्हणून काम केले. त्यांच्या पगारापैकीची रक्कम रुपये ३५,०००/– सचिन मोरे याने त्यांना दिली परंतु उर्वरीत रक्कम रुपये ४९,०००/– दिली नाही. वर्दीजबाब देणारा हा सचिन मोरे जेथे भेटेल तेथे उर्वरीत देय असलेल्या पगाराचे पैशाची मागणी करीत होता, त्या कारणावरुन त्यांच्यात वाद आहे.

३. सरकारपक्षाच्या कथनानुसार दिनांक १३/१२/२०२१ रोजी सकाळी १०:३० च्या सुमारास राजेवाडी गावात सिध्देश्वर सातपुते यांच्या शेतात ऊस तोड चालु असल्यामुळे वर्दीजबाब देणाऱ्याने ऊस भरण्याकरिता ट्रॅक्टर नेला होता. त्यावेळी आबासो पदमाळकर यांच्या मोबाईल क्रमांक ९६०४५९०८७० वरुन

वर्दीजबाब देणाऱ्याचा मोबाईल क्रमांक ९२८४१९१४७८ वर फोन आला, त्यावेळी फोनवरुन सचिन मोरे याने वर्दीजबाब देणाऱ्याला कोठे आहे असे विचारले. सिध्देश्वर सातपुते, राजेवाडी यांच्या ऊसाच्या रानात असल्याचे वर्दीजबाब देणाऱ्याने सांगितले. त्यानंतर थोड्या वेळाने सचिन मोरे व त्याचा भाऊ दादा मोरे असे सिध्देश्वर सातपुते याच्या ऊसाच्या रानात आले व सचिन मोरेने वर्दीजबाब देणाऱ्याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर काठीने मारले. दादा मोरे याने लाथाबुक्क्यानी त्याच्या छातीवर व गळ्यावर मारहाण केली. सचिन मोरे याने जातीवाचक शिवीगाळ केली व म्हणाला " ये महारा तुझे पैसे देवून टाकले आहेत, काहीसुध्दा पैसे माझ्याकडे नाहीत, मस्ती आली आहे महारांना". तेथे हजर असलेले ऊस तोड कामगार पप्पू सातपुते, भारत खांडेकर, उध्दव मुंडे यांनी भांडण सोडविले. त्यानंतर सचिन मोरे व दादा मोरे दिघंची येथे निघून गेले व वर्दीजबाब देणारा त्याच्याकडील ट्रॅक्टर घेवून घरी गेला. सदरच्या घटनेची माहीती वर्दीजबाब देणाऱ्याने त्याचा चुलत भाऊ रोहित भागवत वाघमारे याला दिली. त्यानंतर रोहितने सचिन मोरेला फोन करुन वर्दीजबाब देणाऱ्याला मारहाण का केली याबाबत विचारले. त्यावेळी घरी येतो व सांगतो असे सचिन मोरे म्हणाला परंतु तो घरी आला नाही. त्यानंतर वर्दीजबाब देणारा, त्याची चुलती संगिता भागवत वाघमारे, भाऊ रणजित वाघमारे असे पोलिस स्टेशनला गेले. पोलिसांनी त्याला सरकारी दवाखाना आटपाडी येथे पाठविले. तेथे प्राथमिक उपचार करुन पुढील उपचाराकरिता सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे पाठविले. दिनांक १३/१२/२०२१ रोजी दिवसभर उपचार करुन दिनांक १४/१२/२०२१ रोजी वर्दीजबाब देणाऱ्याने पोलिस स्टेशन आटपाडी येथे आरोपींविरुध्द तक्रार दिली.

**४.** वर्दीजबाब देणा–याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, आटपाडी येथे गुन्हा नोंद क्रमांक ४९२/२०२१, भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४, सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(r) (s) व ३(२)(व्हीए) अन्वयेचा गुन्हा दाखल झाला. सदरच्या प्रकरणाचा तपास

उप–विभागीय पोलीस अधिकारी पदमा कदम यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, कागदपत्र हस्तगत केले, आरोपी क्र. १ सचिन मोरे याच्या अटकपूर्व जामीन अर्जावर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश पारीत केला नसल्यामुळे त्या अर्जावरील अंतिम आदेश प्राप्त करुन आरोपीविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र दाखल करणार असल्यामुळे तपासाअंती आरोपी क्र. २ दादासो मोरे याच्याविरुध्द दिनांक २९/०४/२०२२ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**५.** त्यानंतर तपास अधिकारी यांनी दिनांक १८/०७/२०२३ रोजी आरोपी क्र.१ सचिन मधुकर मोरे याचेविरुध्द न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी क्र. १ व २ यांचेविरुध्द दाखल केलेले दोषारोपपत्र एकाच गुन्हा नोंद क्रमांकाचा असल्यामुळे व खटला एकत्र चालविण्याकरिता पुरवणी दोषारोपपत्र ज्याला विशेष खटला क्र. २९५/२०२४ देण्यात आला, तो प्रलंबित असलेल्या विशेष खटला क्र. २१४/२०२४ च्या प्रकरणात समाविष्ठ (merge) करण्यात आला व माझे पुर्वाधिकारी यांनी विशेष खटला क्र. २९५/२०२४ च्या निशाणी क्र.१ खाली दिनांक १८/०६/२०२४ रोजी त्याबाबतचा आदेश पारीत केला.

**६.** सरकारपक्षातर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२३,३२४ सह ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ कलम ३(१)(r)(s) व ३(२)(व्हीए) चे दोषारोप (नि.क्र.५) माझे पूर्वाधिकारी यांनी नोंदविला. आरोपींना सदरचे दोषारोप वाचुन दाखविले व त्यांच्या भाषेत समजावुन सांगितले. आरोपींनी त्यांच्यावर तोहमत केलेले गुन्हे नाकबुल केले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(बी) अन्वये आरोपींची निवेदने नि.क्र.४२ व ४३ अन्वये नोंदविण्यात आली.

**७.** सरकारपक्षाच्या कथनावरून खालील मुद्दे माझे विचारार्थी उपस्थित होतात. सदरचे मुद्दे व त्यावर माझे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १३.१२.२०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता राजेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली येथील सिध्देश्वर सातपुते यांच्या शेतात आरोपी क्र. १ व २ यांनी समान उद्देश साध्य करण्याकरिता, आरोपी क्र. १ ने वर्दीजबाब देणाऱ्याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर लाकडी काठीने मारुन इच्छापूर्वक दूखापत पोहोचविल्याचे व आरोपी क्र. २ ने वर्दीजबाब देणाऱ्याच्या छाती व मानेवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणाऱ्याला मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींना वर्दीजबाब देणाऱ्याची जात हिंदू–महार असल्याचे माहीत असताना आरोपी क्र. १ ने सिध्देश्वर सातपूते यांच्या शेतात वर्दीजबाब देणाऱ्याला "ये महारा, तुझे पैसे देवून टाकले आहेत, काही सुध्दा पैसे माझ्याकडे नाहीत. मस्ती आली आहे म्हारांना" असे म्हणून वर्दीजबाब देणाऱ्याला हेतूपुरस्सर जातीवाचक शिवीगाळ करुन त्याचा अपमान केल्याचे सरकारपक्षाने शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ करीता –**

८. पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदरचे सर्व मुद्दे एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

९. सुरज (स.सा.क्र.१) याने सरतपासात सांगितले की, गौरीशंकर मारुती शिरकांडे याच्या ट्रॅक्टरवर तो चालक म्हणून काम करीत होता. २०२१ पूर्वी सचिन मोरे याच्या ट्रॅक्टरवर तो व त्याचा छोटा भाऊ रणजित वाहन चालक म्हणून काम करीत होते व त्यांनी तीन महिने काम केले. त्याला व त्याच्या भावाला दरमहा रुपये १४,०००/– पगार ठरला होता. पगाराचे रुपये ३५,०००/– त्यांना दिले, परंतु उर्वरीत ४९,०००/– दिले नव्हते, ज्याची ते मागणी करीत होते, त्यावरुन त्यांचा वाद झाला होता.

**१०.** त्याने पुराव्यात पुढे सांगितले की, दिनांक १३/१२/२०२१ रोजी सकाळी १०:०० च्या सुमारास सिध्देश्वर सातपूते यांच्या शेतात ट्रॅक्टरमध्ये ऊस भरण्याकरिता जात असताना आबासो पदमाळकर याचा त्याला फोन आला. आबासो पदमाळकर याच्या मोबाईलवरुन आरोपी सचिनने त्याला विचारले की, कोठे आहे. त्याने सांगितले की, सिध्देश्वर सातपुते यांच्या रानात ऊस भरण्याकरिता आलो आहे. फोन ठेवल्यानंतर अर्धा तासांनी आरोपी सचिन मोरे व दादासो मोरे हे सिध्देश्वर सातपुते यांच्या शेतात आले. सचिन मोरेने कळकाच्या काठीने त्याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर मारले व दादासो मोरे याने लाथाबुक्क्यांनी त्याच्या गळ्यावर, छातीवर व पाठीवर मारहाण केली. सचिन मोरेने जातीवाचक शिवी देवून, मारहाण करुन पैसे दिले आमच्याकडे काही नाही असे म्हणाला. तसेच "ये महारांनो तुमचे पैसे दिले, मस्ती आली का महारग्या" असेही तो म्हणाला. प्रशांत सातपुते, भारत

खांडेकर, उध्दव मुंडे यांनी भांडण सोडविले.

**११.** त्याने पुराव्यात पुढे सांगितले की, घटनेबाबत त्याचा चुलत भाऊ रोहित वाघमारे याला सांगितले, तेव्हा रोहित वाघमारेने सचिन मोरेला फोन करुन सुरजला का मारले असे विचारले. तेव्हा सचिन मोरे म्हणाला, “तुझ्या घरी येवून काय झाले ते सांगतो." परंतु तो घरी आला नाही. त्याच्या डाव्या हाताला दुखापत झाल्यामुळे पोलिसांनी त्याला उपचाराकरिता सरकारी दवाखाना आटपाडी येथे पाठविले व तेथून सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे पुढील उपचाराकरिता डॉक्टरांनी पाठविले. तो हिंदू महार समाजाचा आहे व आरोपींना ओळखतो.

**१२.** साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात सांगितले की, त्याला व त्याच्या भावाला दरमहा रुपये १४,०००/– पगार देण्याचे ठरले होते असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा त्याच्याकडे नाही. आरोपी त्याला रुपये ४९,०००/– देणे लागत असल्याचे दर्शविणारा पुरावा त्याच्याकडे नाही असेही त्याने मान्य केले आहे. तथाकथीत घटनेच्या वेळी ऊस तोड करणारे २० ते २२ कामगार तेथे हजर होते व तथाकथीत घटना अर्धा तास चालली असेही साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले आहे.

**१३.** साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, प्रशांत सातपुते, भारत खांडेकर, उध्दव मुंडे यांच्या जमिनी सातपुते याच्या जमिनीला लागून आहेत व ते तिघेही त्याच्यापासून १० फूट अंतरावर बसले होते. त्याच्या डाव्या कोपऱ्याला मुका मार लागला. त्याने सरकारी दवाखाना, आटपाडी येथील वैद्यकीय अधिकारी यांना घटना सांगितली नाही व वैद्यकीय अधिकारी यांनी त्याच्याकडे घटनेबाबत चौकशी केली नाही. तेथे ऊस तोडीचे काम चालू होते त्यामुळे गौरीशंकर यांचा दुसरा ट्रॅक्टर घेवून तो घरी गेला. सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे त्याच्या डाव्या हाताला प्लॅस्टर केले होते व दोन महिने ते प्लॅस्टर ठेवले होते. डॉ. विनोद शिरकांडे, आटपाडी यांच्याकडून त्याने त्याच्या हाताचे प्लॅस्टर काढून घेतले.

**१४.** प्रशांत (स.सा.क्र.२) याने पुराव्यात सांगितले की, वर्दीजबाब देणारा व आरोपींना तो ओळखतो. दिनांक १३/१२/२०२१ रोजी त्याच्या गट क्र. १४६ मधील ऊसतोडीचे काम चालू होते. त्यादिवशी सकाळी १०:३० वाजता भांडणाचा आवाज आल्यामुळे तो, त्याच्या शेता शेजारील शेतकरी भारत खांडेकर, वाडे गोळा करण्याकरिता आलेली संगिता वाघमारे व उध्दव मुंडे त्या ठिकाणी गेले. दादोसो मोरे हा सुरज वाघमारेला मारहाण करीत होता. मोरे व सुरज एकमेकांना शिवीगाळ करीत होते. मोरे सुरजला म्हणत होते "माझ्याकडे तुझे कोणतेही पैसे देणे लागत नाही”. त्याचप्रमाणे दादासो व सचिन मोरे असेही म्हणत होते की, " हे म्हारले लय माजलेत, पैसे नाही देणार, सगळे पैसे देवून टाकलेत”. त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर सचिन व दादासो मोरे दिघंची येथे निघून गेले. सुरज वाघमारेच्या डाव्या हाताला लागले होते व तो ट्रॅक्टर घेवून गावात निघून गेला.

**१५.** साक्षीदाराने उलटतपासात सांगितले की, सहा महिने ते वर्षापासून तो वर्दीजबाब देणाऱ्याला ओळखतो. "दादासो व सचिन मोरे असेही म्हणत होते की, हे म्हारले लय माजलेत, पैसे नाही देणार, सगळे पैसे देवून टाकलेत”, हा मजकूर जबाब नोंदविताना पोलिसांना सांगितला होता, परंतु तो मजकूर पोलिसांनी जबाबात का लिहीला नाही याचे कारण तो सांगू शकत नाही, असे उलटतपासात त्याने सांगितले आहे. संगीता वाघमारे फिर्यादीची चुलती आहे, असेही त्याने मान्य केले आहे. ऊस भरण्यासाठी फिर्यादीने जो ट्रॅक्टर आणला होता तोच ट्रॅक्टर घेवून तो गावी परत गेला असेही त्याने उलटतपासात सांगितले आहे.

**१६.** भारत (स.सा.क्र.३) याने पुराव्यात सांगितले की, राजेवाडी येथे त्याची शेती आहे. त्याच्या शेताच्या बाजूला सिध्देश्वर सातपूते याचे शेत आहे. सुरज वाघमारे त्याच्या गावातील आहे. आरोपी हे दिघंची गावचे असून त्यांच्याशी त्याची तोंड ओळख आहे. दिनाक १३/१२/२०२१ रोजी तो शेतात असताना सुमारे १०:००

ते १०:३० वाजता भांडणाचा आवाज आल्यामुळे सिध्देश्वर यांच्या रानात तो गेला. त्या ठिकाणी सुरज वाघमारे, सचिन मोरे व दादासो मोरे यांच्यात वाद चालू होता व दादासो, सचिन हे सुरजला मारहाण करीत होते. सचिन मोरेच्या हातात काठी होती व दादासो मोरे याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. प्रशांत सातपुते व त्याने सोडवासोडव केली.

**१७.** सरकारपक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात साक्षीदाराने मान्य केले आहे की, सचिन मोरेने शिवीगाळ करुन काठीने मारत असताना सुरजच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला लागली. सुरज वाघमारे हा हिंदू महार समाजाचा असल्याचे त्याला माहीत आहे.

**१८.** आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, दिनांक १३/१२/२०२१ रोजी त्याच्या शेतात तो काम करीत होता. सुरज वाघमारेच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला रक्ताची जखम किंवा मुका मार लागलेला त्याने पाहिले नाही. तथाकथीत भांडणाचे कारण त्याला माहीत नाही. फिर्यादी सुरज वाघमारे गावातील असल्यामुळे बऱ्याच दिवसांपासून त्याला ओळखतो. पोलिसांनी त्याला चौकशीला बोलविण्यापर्यंत घटनेबाबत त्याने कोणालाही सांगितले नाही.

**१९.** नंदकुमार (स.सा.क्र.४) हा पंच साक्षीदार असून दिनांक १५/१२/२०२१ रोजी तो व अयाज इनामदार असे तालुका कृषी अधिकारी यांच्या आदेशानुसार पंच म्हणून काम पाहण्याकरिता पोलिस स्टेशन आटपाडी येथे गेले. पोलिस स्टेशनच्या वाहनाने तो व डी. वाय. एस. पी. मॅडम राजेवाडी येथे गेले. वाघमारे त्यांना रस्त्यात भेटला व त्याने घटनास्थळी त्यांना नेले. सिध्देश्वर सातपुते यांच्या शेतातील घटनास्थळी त्यांना नेले. ते मोकळे रान होते. त्या ठिकाणी एक काठी सापडली ती पोलिसांनी पंचांना दाखविली व जप्त केली. घटनास्थळाच्या तीन बाजूला शेत व एका बाजुला साखर कारखाना होता. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर बरोबर आहे.

**२०.** सदर साक्षीदाराने उलटतपासात सांगितले की, त्या दिवशी पोलिस स्टेशन आटपाडी येथे १२:०० ते १:०० च्या दरम्यान गेला व तेथे पाच ते दहा मिनिटे थांबला होता. तथाकथीत घटनास्थळी अंदाजे १:३० ते २:०० चे दरम्यान ते पोहोचले. घटनास्थळ हे सिध्देश्वर सातपुते यांचे शेत असल्याचे त्याची ऐकीव माहीती आहे असे त्याने उलटतपासात मान्य केले आहे. तथाकथीत घटनास्थळ पंचनामा पोलिस करत होते व पंच एका बाजुला थांबले होते. तथाकथीत पंचनामा झाल्यानंतर ते पोलिस स्टेशनला आले व पोलिसांनी तेथे पंचनाम्यावर त्यांच्या सह्या घेतल्या.

**२१.** आबासो(स.सा.क्र.५) याने सरतपासात सांगितले की, गौरीशंकर मारुती शिरकांडे यांच्याकडील ट्रॅक्टरवर वाहन चालक म्हणून काम करतो. तसेच सुरज वाघमारे हा वाहन चालक म्हणून त्यांच्याकडे काम करतो, त्यामुळे सुरजला तो ओळखतो. दिनांक १३/१२/२०२१ रोजी सकाळी १०:३० ते ११:०० वाजता राजेवाडी चौकात तो थांबला होता, त्यावेळी सचिन मोरे व दादासो मोरे तेथे आले व विचारले, सुरज कोठे आहे. त्याने सांगितले की, सातपुते यांच्या ऊसाच्या फडात सुरज ट्रॅक्टर भरण्यास गेला. त्याच्या मोबाईल क्रमांक ९६०४५९०८७० वरुन सुरजला फोन लावला. त्यानंतर सचिन मोरेने सुरजला कोठे आहे असे विचारले व सुरजने फडात असल्याचे सांगितले. सचिन मोरे व दादासो मोरे सुरजकडे गेले. सचिन मोरे व दादासो मोरे यांना तो ओळखतो.

**२२.** साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, सुरज वाघमारे त्याचा मित्र आहे. पोलिसांनी त्याचा जबाब नोंदविला नाही. घटनेच्या वेळी तो मोबाईल वापरत होता याबाबतचे कागदपत्र व सरतपासात सांगितलेल्या मोबाईलचे सिमकार्ड त्याने पोलिसांना दिले नाही. त्याच्या मोबाईलवरुन सुरजला केलेल्या कॉलचे डिटेल्स पोलिसांनी त्याच्याकडून घेतले नाहीत. त्याच्या मोबाईलमध्ये सुरज वाघमारेचा मोबाईल नंबर होता किंवा नाही याची शहानिशा पोलिसांनी केली नाही.

**२३.** डॉ. अतुल (स.सा.क्र.६) यांनी पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक १३/१२/२०२१ रोजी ग्रामीण रुग्णालय, आटपाडी येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना आटपाडी पोलिसांनी सुरज ज्ञानेश्वर वाघमारे याला दवाखान्यात पाठविले. सुरज याच्या वैद्यकीय तपासणीनंतर त्याच्या छातीच्या व मानेच्या उजव्या बाजुला साधी जखम दिसून आली. त्याच्या उजव्या हाताच्या कोपऱ्याचा एक्स–रे काढण्याकरिता त्याला सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे पाठविले. त्याला झालेल्या जखमांबाबतचा दाखला त्यांनी दिला.

**२४.** वैद्यकीय अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, खरचटणे म्हणजे त्वचेचा वरचा थर निघून जाणे. लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्यास खरचटल्याची जखम होवू शकत नाही, तर ती जखम म्हणजे सूज, लालसरपणा अशा प्रकारची असू शकते. शस्त्र दाखवून त्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचे मत पोलिस ठाण्यातून मागितले नाही. कठिण पृष्ठभागावर पडल्यामुळे किंवा स्वतःहुन स्वतःला जखम करुन घेतल्यास जखमांच्या दाखल्यात म्हणजे निशाणी ३३ मध्ये नमूद असलेल्या जखमा होवू शकतात असे वैद्यकीय अधिकारी यांनी मान्य केले आहे. सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे दिनांक १३/१२/२०२१ रोजी रुग्णावर दिवसभर उपचार करण्यात आला असा अहवाल सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथून प्राप्त झाला नाही असेही वैद्यकीय अधिकारी यांनी मान्य केले आहे.

**२५.** पद्मावती(स.सा.क्र.७) तपास अधिकारी असून पोलिस अधिक्षक, सांगली यांच्या दिनांक १४/१२/२०२१ च्या आदेशावरुन पोलिस स्टेशन आटपाडी येथे दाखल झालेल्या गुन्हा नोंद क्रमांक ४९२/२०२१ चा तपास त्यांचेकडे देण्यात आला, असे पुराव्यात सांगितले आहे. त्यादिवशी त्यांनी घटनास्थळावरील काठी दोन पंचासमक्ष जप्त करुन घटनास्थळाचा पंचनामा केला. सदरचा मुद्देमाल पोलिस स्टेशनमधील संबंधीत मुद्देमाल लिपीकाकडे पत्राने जमा करुन त्याची पावती हस्तगत

केली. दिनांक १५/१२/२०२१ रोजी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, फिर्यादीच्या जातीचे प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला हस्तगत केला. फिर्यादीच्या जखमांबाबतचे प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपी दादासो याला अटकपूर्व जामीन मिळाल्यामुळे नॉमीनल अटक केली. गुन्ह्याच्या अनुषंगाने आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे हस्तगत करुन प्रकरणात दाखल केली. आरोपी क्र. २ विरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले. आरोपी क्र.१ सचिन याचा अटकपूर्व जामीन अर्ज माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी नामंजूर केल्यामुळे त्याला अटक केली व त्यानंतर आरोपी क्र. १ विरुध्द पुरवणी दोषारोपपत्र दाखल केले.

**२६.** तपास अधिकारी यांनी उलटतपासात सांगितले की, आरोपी व फिर्यादी यांच्यातील आर्थिक व्यवहाराबाबतचा तपास केला नाही. साक्षीदार यांनी स्वतःहुन सांगितले की, त्यांच्यातील व्यवहार मौखीक व्यवहार असल्यामुळे त्याबाबत तपास केला नाही. त्याबाबत फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला नाही. आबासो पदमाळकर व सचिन मोरे यांच्या मोबाईलचे सीडीआर हस्तगत केले नाही व ते मोबाईल कोणाच्या मालकीचे होते याबाबतचा तपास केला नाही. वैद्यकीय अधिकारी यांना जप्त काठी दाखवून त्या काठीने जखमा होवू शकतात का याबाबत अभिप्राय मिळण्याकरिता पत्र दिले नाही. साक्षीदार यांनी पुन्हा सांगितले की, त्याबाबतचे पत्र वैद्यकीय अधिकारी यांना दिले होते. गौरीशंकर शिरकांडे यांच्याकडे किती ट्रॅक्टर होते व ते ट्रॅक्टर कोणाच्या मालकीचे होते याचा तपास केला नाही. त्या ठिकाणी हजर असलेल्या ऊस तोड मजूरांचे जबाब नोंदविले नाहीत.

**२७.** तपास अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, फिर्यादीच्या डाव्या हाताला प्लॅस्टर केले होते व ते प्लॅस्टर दोन महिने ठेवले होते, त्याचप्रमाणे डॉ. विनोद शिरकांडे, आटपाडी यांच्याकडून फिर्यादीने त्याचे प्लॅस्टर काढून घेतले असे तपासकामी निष्पन्न झाले नाही. कळकाच्या काठीने मारहाण केल्याचे फिर्यादीने

फिर्याद देताना सांगितले होते, परंतु कळकाची हा शब्द फिर्यादीत नमूद नाही असेही त्यांनी उलटतपासात सांगितले आहे. "दादासो व सचिन मोरे असेही म्हणत होते की, हे म्हारले लय माजलेत, पैसे नाही देणार, सगळे पैसे देवून टाकलेत", हा मजकूर जबाब नोंदविताना साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू सिध्देश्वर सातपुते याने सांगितला नव्हता. आरोपी सचिन मोरे याच्या पत्नीने तिची छेडछाड केल्याबाबत त्याचदिवशी फिर्यादीविरुध्द पोलिस स्टेशन आटपाडी येथे फिर्याद दिल्याचे साक्षीदार यांना माहीत नसल्याचे उलटतपासात सांगितले आहे.

२८. सरकारपक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती व्ही. के. मुरचिटे यांनी युक्तीवाद केला की, वर्दीजबाब देणारा हा हिंदू महार समाजाचा असल्याचे आरोपींना माहीत आहे. वर्दीजबाब देणाऱ्याने त्याच्या पुराव्यात आरोपी सचिनने त्याला काठीने मारहाण केल्याचे व आरोपी दादासो याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले आहे. वर्दीजबाब देणारा हा आरोपी सचिन मोरे याच्या ट्रॅक्टरवर चालक म्हणून काम करीत होता व त्या कामाचा पगार दिला नसल्यामुळे वर्दीजबाब देणाऱ्याने त्या पैशाची मागणी केली यावरुन वर्दीजबाब देणाऱ्याला मारहाण करण्याचा आरोपींकडे उद्देश असल्याचेही सिध्द झाले आहे. वर्दीजबाब देणाऱ्याच्या कथनास साक्षीदार आबासो पदमाळकर व साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू सातपुते दुजोरा देत असल्यामुळे व सरकारपक्षाने घटनास्थळ पंचनामा, वर्दीजबाब देणाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र, त्याच्या जातीचा दाखला व आरोपीच्या जातीचा दाखला शाबीत करुन आरोपींनी वर्दीजबाब देणाऱ्याला जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे सिध्द केले आहे. वैद्यकीय अधिकारी यांचाही पुरावा सरकारपक्षाच्या कथनास पाठींबा देणारा आहे. तपास अधिकारी यांनी तपासकामी स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले असून आवश्यक ती कागदपत्रे हस्तगत केली आहेत. सरकारपक्षाच्या साक्षीदारांचा पुरावा खोडून काढण्याकरिता बचावपक्षातर्फे कोणताही पुरावा दिलेला नाही. अशापरिस्थितीत सरकारपक्षाच्या साक्षीदारांचा पुरावा विश्वासास पात्र असल्यामुळे त्यांच्या पुराव्यावरुन

आरोपींविरुध्द तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत केल्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी.

**२९.** आरोपींतर्फे श्री.जी.जी.लाड वकीलांनी युक्तीवाद केला की, वर्दीजबाब देणाऱ्याची जात हिंदू महार असल्याचे त्याने पुराव्यात सांगितलेले नाही, त्यामुळे प्रथमदर्शनी अनुसुचित जाती व जमाती कायद्यातील तरतुदींनुसार सरकारपक्षाने पुरावा दिला नाही असे म्हणता येईल. मोरे व सुरज एकमेकांना शिवीगाळ करीत होते यावरुन त्यांच्यात वाद होता ही बाब स्पष्ट होते. वर्दीजबाब देणारा व साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू व आबासो यांच्या पुराव्यात शिवीगाळीबाबत एकसुत्रता नाही. प्रशांत याने काठीने मारहाण झाल्याचे पुराव्यात सांगितले नाही. भारत याने शिवीगाळीबाबत त्याच्या पुराव्यात काहीही सांगितले नाही. पंच साक्षीदाराने मुद्देमाल काठी ही घटनास्थळावरुन जप्त केलेली काठी असल्याचे आठवत नाही असे सांगितले आहे. फिर्यादीत काठीचे वर्णन सांगितले नाही व दोन दिवसानंतर काठी घटनास्थळावरुन जप्त केली, यावरुन जप्त केलेली काठी ही तथाकथीत घटनेच्या वेळी वापरलेली काठी होती असा निष्कर्ष काढता येणार नाही.

**३०.** आरोपींतर्फे वकीलांनी पुढे युक्तीवादात सांगितले की, त्या ठिकाणी २० ते २२ ऊस तोड कामगार हजर असताना तपास अधिकारी यांनी त्यांच्यापैकी कोणाचेही तपास टिपण नोंदविले नाही. ट्रॅक्टरबाबतचा तपास केला नाही. पदमाळकर याच्याकडे त्या दिवशी मोबाईल होता व त्या मोबाईलमध्ये फिर्यादीच्या मोबाईलचा नंबर होता याबाबतचा तपास केला नसल्यामुळे सरकारपक्षाची संपूर्ण केस निराधार आहे. वर्दीजबाब देणाऱ्याच्या उजव्या हाताचा एक्स–रे काढण्याकरिता त्याला सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे पाठविण्यात आले, परंतु वर्दीजबाब देणाऱ्याने व साक्षीदारांनी त्याच्या डाव्या हाताला लागले असे सांगितले, या पुराव्यावरुन फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे कोणतीही घडना घडली नसल्यामुळे साक्षीदारांच्या

पुराव्यात व वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यात भिन्नता दिसून येते. सरकारपक्षाच्या साक्षीदारांचा पुरावा विश्वासास पात्र नसल्यामुळे त्या पुराव्यावर अवलंबून आरोपींना शासन करता येणार नाही. याउलट आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत केले नसल्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**३१.** आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिद्ध होण्याकरीता आरोपींना वर्दीजबाब देणाऱ्याची जात माहीत होती, तसे असताना वर्दीजबाब देणाऱ्याला आरोपींनी सार्वजनिक ठिकाणी हेतूपुरस्सर जातीवाचक शिवीगाळ करुन त्याचा अपमान केल्याचे व आरोपी क्र. १ व २ यांनी समान उद्देश साध्य करण्याकरिता, आरोपी क्र. १ ने वर्दीजबाब देणाऱ्याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर लाकडी काठीने मारुन इच्छापूर्वक दूखापत पोहोचविल्याचे व आरोपी क्र. २ ने वर्दीजबाब देणाऱ्याच्या छाती व मानेवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सरकारपक्षाने संशयरहीत शाबित करणे आवश्यक आहे.

**३२.** सरकारपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वर्दीजबाब देणारा हा आरोपी सचिन मोरे याचेकडे ट्रॅक्टर चालक म्हणून काम करीत होता व त्याला दरमहा रुपये १४,०००/– पगार ठरला होता याबाबत वर्दीजबाब देणाऱ्याकडे कोणताही पुरावा नाही. तपास अधिकारी यांनी तपासकामी या अनुषंगाने कोणताही तपास केला नाही. तपास अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे आरोपी व वर्दीजबाब देणारा यांच्यातील व्यवहार मौखीक व्यवहार असल्यामुळे त्याबाबतचा तपास केला नाही. मौखीक व्यवहार शाबीत करण्याकरिता तपास अधिकारी यांना साक्षीदारांचे जबाब नोंदवून त्याबाबतचा पुरावा गोळा करता आला असता परंतु असा पुरावा तपास अधिकारी यांनी गोळा केला नाही. ज्या साक्षीदारांचा पुरावा नोंदविला, त्यापैकी एकाही साक्षीदाराने आरोपी व वर्दीजबाब देणारा

यांच्यातील व्यवहाराबाबत काहीही सांगितल नाही. वर्दीजबाब देणाऱ्याच्या तोंडी पुराव्या व्यतिरिक्त आरोपी सचिन मोरे याच्याकडे तो ट्रॅक्टरवर चालक म्हणून काम करीत होता व आरोपीने त्याच्या पगाराची संपूर्ण रक्कम दिली नसल्यामुळे उर्वरीत रक्कम फिर्यादीने मागणी केल्याच्या कारणावरुन आरोपी व फिर्यादी यांच्यात वाद होता याबाबतचा इतर तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे केवळ फिर्यादीचा पुरावा ग्राह्य मानता येणार नाही.

**३३.** फिर्यादीच्या पुराव्यानुसार आरोपी सचिन मोरेने कळकाच्या काठीने त्याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर मारले व आरोपी दादा मोरे याने त्याच्या गळ्यावर, छातीवर व पाठीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, त्यामुळे त्याच्या डाव्या हाताला दुखापत झाली. वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक १३/१२/२०२१ रोजी दुपारी २:३० वाजता सुरज ज्ञानेश्वर वाघमारे याची वैद्यकीय तपासणी केली व त्याच्या उजव्या हाताच्या कोपऱ्याचा एक्स–रे काढण्याकरिता सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे पाठविले. सुरज वाघमारे याच्या छाती व मानेच्या उजव्या बाजुला खरचटलेली जखम झाली होती व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्यास तशा प्रकारची खरचटलेली जखम होवू शकत नाही असे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले आहे. दिनांक ३०/१२/२०२१ रोजी रुग्ण सुरज वाघमारे याने सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे दिवसभर उपचार घेतल्याबाबतचा कोणताही अहवाल प्राप्त झाला नाही असे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले असून त्या दिवशी दिवसभर सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे उपचार घेतल्याचे वर्दीजबाब देणारा सुरज याने सांगितले आहे. सुरज वाघमारे व वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यात एकसुत्रता नाही व वर्दीजबाब देणारा सुरज याच्या सदरच्या पुराव्यास वैद्यकीय अधिकारी दुजोरा देत नाहीत.

**३४.** वर्दीजबाब देणारा सुरज याने उलटतपासात सांगितले की, सरकारी दवाखाना, सांगली येथे त्याच्या डाव्या हाताला प्लॅस्टर केले होते व दोन महिने ते

प्लॅस्टर होते, त्याचप्रमाणे डॉ. विनोद शिरकांडे, आटपाडी यांच्याकडून त्याच्या हाताचे प्लॅस्टर काढून घेतले. तपास अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले की, सरकारी दवाखाना, सांगली येथे वर्दीजबाब देणारा सुरज याच्या डाव्या हाताला प्लॅस्टर केले होते, दोन महिने ते प्लॅस्टर होते व डॉ. विनोद शिरकांडे, आटपाडी यांच्याकडून त्याच्या हाताचे प्लॅस्टर काढून घेतले असे तपासकामी निष्पन्न झाले नाही. वैद्यकीय अधिकारी यांनीही वर्दीजबाब देणारा सुरज याच्या डाव्या हाताला जखम झाली होती असे पुराव्यात सांगितलेले नाही. वर्दीजबाब देताना सुरजच्या डाव्या हाताला प्लॅस्टर घातले होते असे त्याने सांगितलेले नाही. सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे दिनांक १३/१२/२०२१ रोजी वर्दीजबाब देणाऱ्यावर वैद्यकीय अधिकारी यांनी कोणता वैद्यकीय उपचार केला याबाबत तपास अधिकारी यांनी तपास केला नाही. अशा परिस्थितीत वर्दीजबाब देणाऱ्याचा पुरावा, तपास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यात तफावत असल्याचे दिसून येते.

**३५.** वर्दीजबाब देणारा सुरज हा दुसरा ट्रॅक्टर घेवून घरी गेला असे उलटतपासात सांगतो. साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू याने उलटतपासात सांगितले की, ऊस भरण्यासाठी फिर्यादीने जो ट्रॅक्टर आणला होता तोच ट्रॅक्टर घेवून तो गावी परत गेला. गौरीशंकर मारुती शिरकांडे याच्याकडे किती ट्रॅक्टर होते व ते ट्रॅक्टर कोणाच्या मालकीचे होते याचा तपास केलेला नाही. साक्षीदार आबासो हा गौरीशंकर मारुती शिरकांडे याच्याकडील ट्रॅक्टरवर वाहन चालक म्हणून काम करतो परंतु त्यानेही शिरकांडे याच्याकडे किती ट्रॅक्टर आहेत व ते कोणाच्या मालकीचे आहेत याबाबत पुराव्यात काहीही सांगितले नाही. सरकारपक्षाच्या कथनानुसार साक्षीदार प्रशांत हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे, परंतु वर्दीजबाब देणाऱ्याने परत जाताना नेलेला ट्रॅक्टर याबाबत वर्दीजबाब देणारा व सदर साक्षीदाराच्या पुराव्यात विसंगती आहे.

**३६.** आरोपी सचिन मोरेने काठीने डाव्या हाताच्या कोपऱ्यावर मारले व आरोपी

दादा मोरे याने छातीत, गळ्यास मारहाण केली असे वर्दीजबाब निशाणी १४ मध्ये नमूद केले असून वर्दीजबाब देणाऱ्याने न्यायालयात दिलेल्या पुराव्यात आरोपी दादा मोरे याने त्याच्या गळ्यावर, छातीवर व पाठीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले आहे. साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू याने पुराव्यात सांगितले की, दादासो मोरे हा सुरज वाघमारेला मारहाण करीत होता. साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू याने त्याच्या पुराव्यात आरोपी सचिन मोरेने सुरजला काठीने डाव्या हाताच्या कोपऱ्यावर मारल्याचे सांगितले नाही. तसेच आरोपी दादासो मोरे याने सुरजच्या गळ्यावर छातीवर व पाठीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे सांगितलेले नाही. साक्षीदार भारत याने सरतपासात सांगितले की, दादासो मोरे व सचिन मोरे सुरजला मारहाण करीत होते, सचिन मोरेच्या हातात काठी होती व दादासो मोरेने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी सचिन मोरेने सुरजला काठीने मारहाण केली व दादासो मोरेने सुरजच्या गळ्यावर, छातीवर व पाठीवर मारहाण केली असे साक्षीदार भारत याने सरतपासात सांगितले नाही. सरकारपक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, सचिन मोरे शिवीगाळ करुन काठीने मारत असताना सुरजच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला लागले. बचाव पक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले आहे की, सुरज वाघमारेच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला रक्ताची जखम किंवा मुका मार लागल्याचे त्याने पाहिले नाही. तथाकथीत भांडणाचे कारण त्याला माहीत नाही. साक्षीदार भारत हा बऱ्याच दिवसांपासून वर्दीजबाब देणार सुरज याला ओळखतो. सदरच्या साक्षीदाराने त्याच्या सरतपासात सांगितलेला मजकूर हा अपुरा मजकूर सांगितला असल्यामुळे सरकारपक्षाने त्याचा उलटतपास घेतला. सरकारपक्षाच्या कथनानुसार सदरचा साक्षीदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्यामुळे त्याला घटनेची माहीती आहे, परंतु सदर साक्षीदाराने सरतपासात संपूर्ण घटना सांगितलेली नसल्यामुळे, सरकारपक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात सरकारपक्षाला, बचावपक्षातर्फे घेतलेल्या उलटतपासात बचावपक्षाला मदत होईल अशी विधाने करित असल्यामुळे

व वर्दीजबाब देणाऱ्याला ओळखत असल्यामुळे त्याच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही.

**३७.** अनुसुचित जाती व जमाती कायद्यातील तरतुदीनुसार सार्वजनिक दृश्य (public view) म्हणजे ज्या ठिकाणी वर्दीजबाब देणारा व आरोपी यांच्यात जातीवरून अपमान अथवा धमकी देणे असे प्रसंग घडत असताना त्याठिकाणी स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदार यांनी ती घटना ऐकली किंवा पाहिली असली पाहिजे. वर्दीजबाब देणारा सुरज याने उलटतपासात मान्य केले आहे की, तथाकथीत घटनेच्या वेळी ऊसतोड करणारे २० ते २२ कामगार हजर होते. तपास अधिकारी यांनी या ऊसतोड कामगारांपैकी कोणाचाही जबाब नोंदविला नाही. ज्या साक्षीदारांचे जबाब तपास अधिकारी यांनी नोंदविले त्या साक्षीदारांपैकी साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू हा वर्दीजबाब देणाऱ्याला सहा महिने ते वर्षापासून ओळखतो व साक्षीदार भारत हा वर्दीजबाब देणारा सुरज हा त्याच्याच गावातील असल्यामुळे बऱ्याच दिवसांपासून ओळखतो. या दोनही साक्षीदारांची शेतजमीन सिध्देश्वर सातपुतेच्या शेताशेजारी आहे, याचाच अर्थ साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू व भारत हे वर्दीजबाब देणा–याला तथाकथित घटनेच्या पुर्वीपासुन ओळखत होते, त्यामुळे ते स्वतंत्र व त्रयस्थ साक्षीदार आहेत असे म्हणता येणार नाही.

**३८.** वर्दीजबाब देणारा सुरज सरतपासात सांगतो की, आरोपी सचिन मोरे याने जातीवाचक शिवी दिली व म्हणाला, "ए महारांनो तुमचे पैसे दिले, मस्ती आली का महारग्या”. साक्षीदार प्रशांत ऊर्फ पप्पू सरतपासात सांगतो की, मोरे सुरजला म्हणत होते, “माझ्याकडे तुझे कोणतेही पैसे देणे लागत नाही, हे म्हारले लय माजलेत, पैसे नाही देणार, सगळे पैसे देवून टाकले". त्याने असेही सांगितले की, दादासो व सचिन मोरे यांनी शिवीगाळ केली. त्याचे तपास टिपण नोंदविताना सदर साक्षीदाराने “माझ्याकडे तुझे कोणतेही पैसे देणे लागत नाही, हे म्हारले लय माजलेत, पैसे नाही

देणार, सगळे पैसे देवून टाकले" हा मजकूर सांगितला नाही असे तपास अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले आहे. साक्षीदार भारत याने त्याच्या सरतपासात आरोपींनी वर्दीजबाब देणाऱ्याला जातीवाचक शिवीगाळ केली असे सांगितलेले नाही. याउलट सचिन मोरे काठीने मारहाण करीत असताना, "ए महारा तुझे पैसे देवून टाकले आहेत, काही सुध्दा पैसे माझ्याकडे नाहीत, मस्ती आली आहे महारांना" असे म्हणाल्याचे नाकबूल केले आहे. वर्दीजबाब देणाऱ्याने दिलेल्या पुराव्याला साक्षीदार प्रशांत उर्फ पप्पू व साक्षीदार भारत दुजोरा देत नाहीत. त्यांच्या पुराव्यात एकसुत्रता नाही. अशा परिस्थितीत वर्दीजबाब देणाऱ्याने सांगितलेली घटना घडली होती किंवा नाही याबाबत शंका उपस्थित होते.

३९. सरकारपक्षाच्या कथनानुसार साक्षीदार आबासो याच्या मोबाईलवरुन आरोपी सचिन हा वर्दीजबाब देणाऱ्याशी त्याच्या मोबाईलवर बोलला व कुठे आहेस असे विचारले. साक्षीदार आबासो याला आरोपी सचिनने वर्दीजबाब देणाऱ्याला फोन लावण्यास सांगितले नसताना आबासो याने वर्दीजबाब देणाऱ्याला का फोन लावला याचा खुलासा सरकारपक्षाने करणे अपेक्षीत असून असा कोणताही खुलासा सरकारपक्षाच्या साक्षीदारांनी केलेला नाही. आरोपी सचिन मोरे व दादासो मोरे हे सुरजकडे जात आहेत असे आरोपींनी त्याला सांगितले होते असे साक्षीदार आबासो याने सांगितले नाही, त्यामुळे आरोपी सुरजकडे गेले असे साक्षीदार आबासो याने कशाच्या आधारे सांगितले हे स्पष्ट केले नाही. साक्षीदार आबासो हा वर्दीजबाब देणारा सुरज वाघमारेचा मित्र आहे. पोलिसांनी त्याचा जबाब नोंदविला नसल्याचे व पहिल्यांदा त्याला पोलिसांचा फोन आल्याचे त्याने पुराव्यात सांगितले. या परिस्थितीत साक्षीदार आबासो याने मित्राला मदत करण्याकरिता पुरावा दिला आहे असा निष्कर्ष काढता येईल.

४०. घटनास्थळ पंच साक्षीदार नंदकुमार याने पोलिस स्टेशनमध्ये पंचनाम्यावर

सह्या घेतल्याचे सांगितले असून घटनास्थळ हे सिध्देश्वर सातपुते यांचे शेत असल्याचे साक्षीदार नंदकुमार याची ऐकीव माहीती आहे. घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता १:३० ते २:०० च्या दरम्यान पोहोचले असे साक्षीदाराने सांगितले असून घटनास्थळ पंचनामा निशाणी २८ पाहता दिनांक १५/१२/२०२१ रोजी ११:४५ ते १२:५५ या कालावधीत घटनास्थळ पंचनामा केल्याचे दिसून येते. पंच साक्षीदाराचा पुरावा व घटनास्थळ पंचनामा यामध्ये पंचनामा केल्याच्या वेळेबाबत भिन्नता आढळून येते. तसेच घटनास्थळी पंचनामा केल्यानंतर पंचाच्या सह्या घेतल्या नाहीत असेही दिसून येते. या कारणामुळे दिनांक १५/१२/२०२१ रोजी ११:४५ ते १२:५५ वाजता घटनास्थळ पंचनामा केला होता याबाबत शंका उपस्थित होते.

**४१.** घटनास्थळावरुन तीन पेऱ्याची एक कळकाची भरीव काठी जप्त केल्याचे घटनास्थळ पंचनाम्यात नमूद आहे. बऱ्याच दिवसापूर्वीचे प्रकरण असल्यामुळे पंच साक्षीदाराने ती काठी आर्टीकल 'ए' असल्याचे आठवत नाही असे सांगितले आहे. वर्दीजबाब देणाऱ्याने वर्दीजबाबात ती काठी कळकाची होती असे सांगितलेले नाही. तपास अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात खुलासा केला की, कळकाची हा शब्द फिर्यादीत नमूद केलेला नाही. तसेच घटनास्थळ पंचनाम्यात कळकाच्या काठीचा उल्लेख केला नाही. वर नमूद केल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनाम्यात कळकाच्या काठीचा उल्लेख आहे, परंतु तपास अधिकारी सांगतात की, कळकाच्या काठीचा उल्लेख घटनास्थळ पंचनाम्यात केलेला नाही, यावरुन तपास अधिकारी यांनी घटनास्थळी जावून कळकाची काठी जप्त केली व त्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा लिहीला याबाबत शंका उपस्थित होते.

**४२.** तपास अधिकारी यांनी स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले नसल्यामुळे त्या पुराव्या अभावी अनुसुचित जाती व जमाती कायद्यातील तरतुदी अन्वये आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिद्ध झाले नाहीत. त्यामुळे वर्दीजबाब

देणाऱ्याने व त्याला मदत करण्याकरिता त्याला ओळखणाऱ्या लोकांनी दिलेला पुरावा ग्राह्य मानून आरोपींना शासन करता येणार नाही.

**४३.** वर्दीजबाब देणारा हा हिंदू–महार समाजाचा आहे हे शाबीत करण्याकरिता सरकारपक्षाने वर्दीजबाब देणाऱ्याचा जातीचा दाखला दाखल केला आहे. वर्दीजबाब देणाऱ्याचा जातीचा दाखला, आरोपी सचिन याचे जातीबाबतचे बोनाफाईड सर्टीफिकेट व आरोपी दादासाहेब याच्या जातीबाबत त्याचा शाळा सोडल्याचा दाखला बचावपक्षातर्फे मान्य केले आहे. सदरच्या जातीचा दाखला निशाणी २४ वरुन वर्दीजबाब देणाऱ्याची जात हिंदू–महार असल्याचे व निशाणी ३४ व ३५ वरुन आरोपी क्र. १ व २ हे हिंदू–मराठा समाजाचे असल्याचे स्पष्ट होते.

**४४.** सरकारपक्षातर्फे दिलेल्या पुराव्याचे एकत्रितपणे विचार केला असता असे दिसून येते की, दिनांक १३/१२/२०२१ रोजी वर्दीजबाब देणारा पोलिस स्टेशनला वर्दीजबाब देण्याकरिता गेला होता हे सिध्द झालेले नाही. वर्दीजबाब देणाऱ्याच्या डाव्या हाताला कोणत्या कारणामुळे प्लॅस्टर केले होते व त्यादिवशी दिवसभर तो सिव्हील हॉस्पीटल, सांगली येथे होता ही बाब सिध्द झालेली नाही. वर्दी जबाब देण्यास उशीर झाल्याचे कोणतेही संयुक्तीक कारण वर्दीजबाब देणाऱ्याने दिलेले नाही. वर्दीजबाब देणारा व साक्षीदार यांच्या पुराव्यात एकसुत्रता नाही. वर्दीजबाब देणारा हा आरोपींकडे ट्रॅक्टर चालक म्हणून काम करीत होता व त्या कामाचा संपूर्ण पगार वर्दीजबाब देणाऱ्याला आरोपींनी दिला नाही याबाबत तपास अधिकारी यांनी तपास केला नाही. साक्षीदार आबासो व आरोपी सचिन यांच्या मोबाईलचे सीडीआर हस्तगत केले नाहीत. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत. अशाप्रकारे तपास कामी त्रुटी ठेवलेल्या आहेत. वर्दिजबाब देणारा हा अनुसूचित जाती व जमातीचा आहे, असे जरी शाबित झाले असले तरीही, आरोपींनी वर्दिजबाब देणा–याला सार्वजनिक दृश्य (public view)ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ करुन त्याचा केल्याचे स्वतंत्र किंवा

त्रयस्थ साक्षीदार यांनी सांगितले नाही, त्यामुळे अनुसूचित जात व अनुसूचित जमात कायदया अंर्तगत आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सिद्व झाले नाहीत.

**४५.** वर नमुद केलेल्या कारणांमुळे मी या निष्कर्षास आले आहे की, दि.१३.१२.२०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता सिध्देश्वर महादेव सातपुते यांच्या जमीन गट क्र.१४६ मध्ये आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याकरिता वर्दीजबाब देणा–याला, पगाराचे पैसे देणेघेणेचे कारणावरुन आरोपी सचिन याने वर्दीजबाब देणाऱ्याच्या डाव्या हाताचे कोपऱ्यावर काठीने मारुन वर्दीजबाब देणाऱ्याच्या हातास जखम केल्याचे, वर्दीजबाब देणारा यास जातीवाचक शिवीगाळ करुन हेतुपुरस्सर त्याचा अपमान केल्याचे व आरोपी क्र. २ दादासो याने वर्दीजबाब देणा–याच्या छाती व गळ्यावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन वर्दीजबाब देणाऱ्यास इच्छापूर्वक दुखापत पोहचविल्याचे सरकारपक्षाने संशयरहित शाबीत केले नाही.

**४६.** आरोपींवर तोहमत केलेले गुन्हे सरकारपक्षाने संशयरहीत सिद्ध केले नसल्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना देवुन त्यांचेवर तोहमत केलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब आरोपींतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य मानून व सरकारपक्षातर्फे केलेला युक्तीवाद फेटाळून मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देवुन मुद्दा क्रमांक ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ सचिन मधुकर मोरे व आरोपी क्र. २ दादासो मधुकर मोरे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक सुधारीत) कायदा कलम ३(१)(आर)(एस) व ३(२)(व्हीए) च्या गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी दिलेले वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक कळकाची तीन पेऱ्याची भरीव काठी किमंतहीन असल्यामुळे अपिल कालाधीनंतर नियमाप्रमाणे नाश करावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–ए अन्वये प्रत्येकी रु.२५,०००/– जातमुचलका आरोपींनी द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.04.23 15:37:44 +0530

विटा. (उषा वि. इंदापूरे)
दिनांक – २३/०४/२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, विटा

.....

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

Name of Stenographer : S. K. Patil (Steno Grade-I)
Court : Addl. Sessions Judge,Vita
Date of order : 23.04.2026
Signed by Presiding officer on : 23.04.2026
Uploaded on : 23.04.2026

-----